# भारतीय परंपरेतील प्रमुख धर्मांचा नैतिक दृष्टिकोण

**प्रा. डॉ. सीमा देशपांडे**
तत्वज्ञान विभाग प्रमुख,
एल.ए.डी. महाविद्यालय, शंकरनगर, नागपूर–10

★★★

**सारांश** – 'धर्म' हा भारतीय संस्कृतीच्या रचनेतील व विकासातील महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीचे विचार, भावना, संकल्प, प्रेरणा, संस्कार, सवयी व आचार या सर्व गोष्टी सर्वस्वी व्यक्तीच्या मनातील धार्मिक दृष्टिकोणावर अवलंबून असतात. विज्ञानाच्या क्षेत्रात माणसाने प्रचंड प्रगती केलेली असली तरी 'धर्म', 'तत्त्वज्ञान', 'नीती' या गोष्टी माणसाच्या दैनंदिन जीवनाचे अधिशठान आहेत. ज्या त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन पुरवितात.

आजच्या भारतीय संस्कृतीच्या विकासात आर्य, द्रविड, हिंदू, बौध्द, जैन, ख्रिष्चन, शीख, इस्लाम, पारशी इत्यादी विविध धर्म प्रणालींनी आकार दिलेले आढळतो. प्रत्येकच धर्म व्यक्तीच्या वर्तनास मार्गदर्शक ठरतो. प्रेम, ज्ञान, दान, अहिंसा, सत्य इ. नैतिक मुल्यांची शिकवण देतो. एकूणच व्यक्ती व समूह यांच्या वर्तनाशी व व्यवहाराशी धर्माचा प्रत्यक्ष संबंध असतो.

प्रत्येक धर्माची नावे ही वेगवेगळी असली तरी अंतिमतः प्रत्येक धर्माची उभारणी ही व्यक्तीला नीतिमान बनविणे या संकल्पनेतूनच झालेली आहे असे दिसून येते, त्यामुळे धर्म हा मानवी जीवनाच्या इतिहासात महत्त्वाचा घटक ठरतो.

**सांकेतिक शब्द** : धर्म, नैतिक तत्त्वे, जीवनमूल्ये.

**प्रस्तावना** – भारतीय इतिहास हा धर्म दर्षन आणि संस्कृती यांच्या गाथांनी भरलेला आहे. धर्म हा तर मानवी संस्कृतीच्या रचनेतील महत्त्वाचा घटक होय- धर्माने सांगितलेली नैतिकतत्त्वे माणसाच्या दैनंदिन जीवनाचे अधिष्ठान आहेत. आजच्या भारतीय संस्कृतीच्या विकासाला द्रविड, हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, षीख, इस्लाम, पारशी इत्यादी विविध धर्म प्रणालींनी आकार व अर्थ दिलेला आढळतो. वरील सर्व धर्मांची स्थापना ही वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या काळी, स्थळी झाली असली तरी प्रत्येक धर्माने आपले मौलिक व नैतिक विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

त्यादृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधात, भारतीय परंपरेतील प्रमुख धर्मांचा नैतिक दृष्टिकोण अभ्यासला. त्यांचे तात्त्विक व नैतिक

विचार हे या शोधनिबंधाच्या अध्ययनाचे केंद्र आहे.

भारतातील प्रमुख धर्माचे परिचय करून घेण्यापूर्वी 'धर्म' या संज्ञेचा अर्थ समजावून घ्यायला हवा. धर्म' हा शब्द 'धृ' या धातूपासून तयार झालेला असून 'धृ' याचा अर्थ 'धारण करणे' असा होतो. 'धारणात ध र्म मित्याह धर्मो धारयाति प्रजा अशी त्याची व्याख्या होते. म्हणजे प्रजेला एका सूत्रात बांधणारा तो धर्म, असा त्याचा अर्थ होतो. ऋग्वेदात आधार देणे, पोषण करणे, पालन करणे नैतिक कायदे व आचार अषा अर्थाने 'धर्म' हा शब्द योजिला गेल्याचे आढळते तर लोक व्यवहार नीट चालविणे हेच धर्माचे खरे कार्य होय असे महाभारतातील शांतीपर्वात म्हटलेले आहे.

वरील सर्व अर्थाशी मिळतीजुळती अशी व्याख्या 'ऐतरेय ब्राह्मण' या धर्मग्रंथात, न्यायभाश्यात, ऋग्वेदातील पुरुष सुक्तात केलेली आढळते तर मीमांसकाच्या जैमिनी सुत्रात 'चोदनालक्षणोर्थ धर्मः।' अशा धर्मविशयक कल्पनेत, चोदना म्हणजे उपदेश, आज्ञा, विधी, प्रेरणा होय तर मनुःस्मृती मध्ये धर्माची दहा लक्षणे सांगितलेली आहेत. 'धैर्य', 'क्षमा', 'संयम', 'अस्तेय', 'शौच', 'इंद्रियनिग्रह', 'बुध्दी', 'विद्या', 'सत्य' आणि 'क्रोध न करणे' इत्यादी धर्मशास्त्रामध्ये चार पुरुषार्थापैकी धर्म या पुरुषार्थाला सर्वात महत्त्वाचे स्थान आहे.

थोडक्यात, व्यक्ती व समाज यांनी कसे वागावे कोणती आचारसंहीता आचरणात आणावी याचे विवेचन 'धर्म' या शब्दात अभिप्रेत आहे तर धर्माचे प्रयोजन सांगतांना कणादांनी धर्माची व्याख्या – 'यतोभ्युदयानिः श्रेयसिद्धिः सः धर्म,' अशी केलेली आहे. म्हणजेच ज्याने संसारिक समृध्दी (अभ्युदय) आणि आध्यात्मिक कल्याण (निःश्रेयस) यांची सिध्दी होते तो धर्म. वैशेशिकांनी केलेली धर्माची ही व्याख्या भौतिक आणि आध्यात्मिक दोन्ही क्षेत्रात समन्वय प्रस्थापित करते.

अशा प्रकारे भारतीय परंपरेत 'धर्म' या शब्दाचा अर्थ वेगवेगळया संदर्भात वेगवेगळा केलेला आढळतो. लैकिक अर्थाने ज्याला आपण धर्म म्हणतो तो म्हणजे 'हिंदू', 'इस्लाम', 'ख्रिश्चन', ' बौध्द' या प्रमुख धर्मांची नैतिक जीवन दृष्टि जाणून घेवू.

**हिंदू धर्म** : जगातील अतिप्राचीन आद्यधर्म समजल्या जाणाऱ्या हिंदू धर्माने त्रिविध दृष्टिकोण स्वीकारलेला दिसून येतो. त्यामध्ये ऐहिकवाद, पारमार्थिकवाद व उभयवाद या तीन दृष्टिकोणांचा समावेश होतो. जसे हिंदू धर्माने समाजातील लोकांना दैनंदिन जीवन व्यवहार करीत असतांना माणसामाणसांमधील संबंध चांगले रहावे म्हणून आश्रम व्यवस्था, वर्णव्यवस्था सांगितली, 'सत्य', 'अहिंसा' व इतर 'नीतिधर्म' यांची मीमांसा केली. या सर्वावरून हिंदू धर्मातील ऐहिक दृष्टिकोण स्पष्ट होतो. तसेच उपनिशदातील सांगितलेल्या ब्राम्हणस्वरुपावरुन, स्मृती व धर्मशास्त्रात केलेल्या आत्मा, परलोक इत्यादींच्या विवेचनावरुन

तसेच पुराण ग्रंथ, आगम ग्रंथ यामध्ये सांगितलेल्या व्रत, यात्रा, उपासना या सर्व गोष्टीतून हिंदू धर्मातील आध्यात्मिक प्रेरणा स्पष्ट होते, जी पारलौकिक जगताविशयीची जागरुकता सुस्पष्ट करते. हिंदू धर्माने अनेक देवतावाद, पाप, पुण्य, पुनर्जन्म, कर्मसिध्दांत या गोष्टी मानल्या आहेत. हिंदू धर्मात आध्यात्मिक जीवनाबरोबरच समाजधारणेला व अभ्युदयालाही महत्त्व दिलेले दिसून येते. म्हणूनच या धर्मात इह–पर, प्रपंच–परमार्थ, प्रेयस–श्रेयस, अभ्युदय– निःश्रेयस इ. च्या संदर्भात समन्वयी दृष्टिकोण दिसून येतो. गीतेतील उपदेश, श्रुती, स्मृती, पुराणे, दर्शन, मध्ययुगीन संत, भारतीय तत्त्वचिंतकांनी याच भूमिकेचा स्वीकार केलेला दिसून येतो. हिंदू धर्माच्या आचारधर्माचे, विधींचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येते की, ते ऐहिक सुखाला नाकारीत नाही तर त्यांनी मोक्षा व्यतिरिक्त अर्थ व काम हे पुरुशार्थ देखील स्वीकारलेले आहे. पण ते केवळ साधन म्हणून साध्य म्हणून नाही. हिंदू धर्मानुसार, धर्माधिष्टीत अर्थ काम हेच पुरुषार्थ होत. धर्म विरोधी अर्थ काम पुरुषार्थ नव्हे.

हिंदू धर्मातील आचारधर्माच्या या विवेचनात वर्णाश्रमधर्मानुसार केले जाणारे नित्यविधी म्हणजे संध्या, देवपूजा, पितृतर्पण, यज्ञ, अग्निपूजा, इ. चे पालन करणे आवश्यक मानलेले आहे. तर सकाम उपासनेमध्ये यज्ञ, दान, तप, व्रत, उपवास इत्यादींचा समावेश दिसून येतो. नैमित्तिक विधींमध्ये जन्म, मृत्यू, विवाह या प्रसंगी करण्यात येणाऱ्या विधींचा समावेश होतो. जीवनातील प्रत्येक अवस्थेत आध्यात्मिक महत्त्व देणे हा या संस्कार विधीचा हेतू आहे. यावरुन प्रापंचिक व पारमार्थिक जीवन यात अंतर राहू नये व संपूर्ण मानवी जीवन पवित्र व्हावे, धर्मनिष्ठ व्हावे हा हिंदू धर्माचा हेतू दिसून येतो.

थोडक्यात, हिंदू धर्मशास्त्रात, मानवी जीवनामध्ये आध्यात्मिक साफल्य व जन्म–परंपरेवर आधारलेला कर्मसिध्दांत व चातुर्वर्ण्यव्यवस्था, तसेच आश्रमव्यवस्था याद्वारे मनुष्याला क्रमाक्रमाने मोक्षस्वरुपी परम पुरुशार्थ कसा साध्य करुन घेता येतो, याविषयी जे मार्गदर्शन केलेले आहे, त्यातून हिंदू धर्मातर्गत नीतिविचार व्यक्त होतातच पण त्याच बरोबर भारतीय नीती ही हिंदू धर्मशास्त्राचे अधिष्ठान होय हे सुस्पष्ट होते.

**इस्लाम धर्म** :– इस्लाम धर्मानुसार, हा धर्म ईष्वरी संदेशातून प्रकट झालेला पवित्र धर्म असून, ईश्वर एक आहे. मुहम्मद पैगंबर त्याचे प्रेषित आहेत. तत्कालीन अरब समाजातील अनीती, अंधश्रध्दा, यांना आळा घालण्यासाठी अरबस्थानातील मक्का या शहरी इ. स. 610 साली नव्या धर्माची स्थापना केली व त्याला 'इस्लाम' हे नाव दिले. इस्लाम हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ 'शांतीमध्ये प्रवेश करणे' असा होतो.

पैगंबरांनी तत्त्वज्ञानाच्या जंजाळात न पडता सरळ कर्ममय धर्माचाच पुरस्कार केला. अनेकश्वरवाद व मुर्तिपूजा यांना त्यांनी कडाडून विरोध केला. इस्लाम धर्माचे इमान (श्रध्दा) व अमल (आचरण) असे दोन भाग पडतात.'इमान' म्हणजे प्रथा पुढील सहा गोष्टींवर त्यांचा मुलभूल श्रध्दा सामावलेल्या आहेत. 1) अलाह 2) देवदूत (फरिष्ते) 3) ईष्वरग्रंथ, कुराण 4) ईश्वराचे प्रेशित वा पैगंबर रसूल 5) अंतिम निवाडयाचा दिवस 6) ईष्वराचे आदेष नबीने घोषित केलेल्या सत्याची स्वीकृती.

इस्लाम धर्मानुसार जे पुण्यवान, सदाचरणी असतील ते जन्नतमध्ये जातात जे दुराचरणी आहेत ते 'जहन्नूम' म्हणजे नरकात जातात अशी श्रध्दा आहे. कुराणच्या 'अमल' या विभागातील ज्या पाच आवश्यक गोष्टी म्हणजे धार्मिक कृत्ये सांगितलेली आहेत त्यांना 'पंचअर्कात' असे म्हणतात. त्यामध्ये दिवसातून पाच वेळा नमाज पठण, पाच वेळा कलम पठण, दान देणे, रोजा ठेवणे व जीवनात एकदा तरी हजला जाणे आवश्यक मानले जाते. वरील सहा गोष्टींवर पूर्ण श्रध्दा व पाच आचारांचे पालन मिळून इस्लाम धर्म बनतो. वरील सहा गोष्टींवरुन इस्लामांची जी जीवनदृष्टी स्पष्ट होते त्यात त्यांनी, इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवास सृष्टीतील श्रेष्ठ घटक मानलेले आहे. तसेच मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा तो कुठल्याही पूर्वसंस्कारांनी पापमय होत नाही. त्याला मिळणारे सुख वा दुःख हे त्याच्या कर्माचा परिणाम आहे. मरणोत्तर स्वर्गनरकाची कल्पना इस्लामांना मान्य आहे. तसेच ईष्वरी प्राप्तीसाठी इस्लामधर्मामध्ये कर्मकाण्डाला स्थान नाही. प्रत्येकाला त्याच्या कर्मफलाप्रमाणे स्वर्गनरक प्राप्त होतो. अशी त्यांची श्रध्दा आहे. याशिवाय इस्लाम धर्माने, मानवाने जीवनात कसे वागावे, या संबंधी काही नियम सांगितलेले आहेत. या नियमांचे पालन करणे प्रत्येक इस्लामी व्यक्तीचे कर्तव्य मानले गेले आहे. ते खालील प्रमाणे – 1) ईश्वराप्रित्यर्थ सेवा करणे 2) ज्ञान संपादन करणे, 3) न्यायी बनणे 4) सत्य बोलणे 5) शिष्टाचारांचे पालन करणे 6) कृतज्ञता दर्शविणे 7) दान देणे 8) मातापित्यांची सेवा करणे 9) सौजन्य व नम्रतेचा स्वीकार करणे 10) प्राण्यांवर दया करणे 11) संकटाला धैर्याने सामोरे जाणे 12) क्षमा करणे 13) पष्चात्ताप होणे 14) मद्यपान न करणे 15) व्यभिचार न करणे 16) जुगार न खेळणे इत्यादी सदाचारावर इस्लाम धर्माने भर दिलेला आहे. सारांष रुपाने इस्लाम धर्माविशयी असे सांगता येईल की, अनाचार, हिंसा, पाप–दुर्गुण दूर करुन जीवनात तपष्चर्या व ईष्वर चिंतन यावर अधिक भर द्या, ही षिकवण त्यांनी समाजाला दिली.

**बौध्द धर्म** :– इ. स. पूर्व सहाव्या शतकात बौध्द धर्म उदयास आला. भगवान बुध्दांनी प्रवर्तित केलेल्या धर्माची जगातील प्रचलित धर्मात गणना होते. बौध्द धर्म हा जगातील एकच असा धर्म आहे की जो मानवी प्रज्ञेतून निर्माण झालेला धर्म होय. बुध्दांच्या धर्मप्रसाराच्या या कार्याला सारनाथ पासून प्रारंभ झाला. वैदिक धर्मातील यज्ञ जातिभेद, व आत्म्याचे अमरत्व यांना विरोध करुन कर्मकांडापेक्षा नैतिक वर्तन हे श्रेष्ठ होय व तोच मुक्तीचा मार्ग होय असे या धर्माने सांगितले. म्हणून जप, तप, उपवास, व्रत, तीर्थयात्रा इत्यादी नियम व्यर्थ असून तृष्णेचा पूर्णपणे नायनाट करणे हाच मोक्षाचा खरा उपाय होय. अशी शिकवण गौतम बुध्दांनी आपल्या धर्मप्रसाराच्या माध्यमातून लोकांना दिली.

गौतम बुध्दांनी ज्या गोष्टी बुध्दी पलिकडच्या आहेत, अनाकलनीय आहेत, त्या गोष्टींविषयी म्हणजे विष्वाची निर्मिती, विनाश, ब्रम्हतत्त्व, आत्मतत्त्व याविषयी तटस्थेतेची भूमिका घेतलेली होती. आपल्या दैनंदिन जीवनातील दुःखाशी याचा कोणत्याही प्रकारे संबंध नाही. म्हणून प्रत्यक्ष अनुभवास येणारी संकटे व नित्य प्रतीत होणारी दुःखे, यांनाच प्रबळ प्रमाण घेऊन त्यांनी बौध्द धर्माची उभारणी केली. त्यामुळेच या धर्मात, ईश्वर, आत्मा, परलोक इत्यादी तत्त्वांचे खंडन केलेले दिसून येते. शुध्द चरीत्र व संयमात्मक जीवन जगण्यास महत्त्व दिलेले आढळते. म्हणूनच बौध्द धर्माने, 'प्रज्ञा' व 'करूणा' यांना श्रेष्ठ स्थान देणारा, नीतीचा मार्ग सांगितलेला आहे. ज्याच्या आधारे अहंकाराचा निरास, चित्तशुध्दी व विश्व व्यापक मैत्री यांच्या योगाने या जन्मातच निर्वाण प्राप्ती शक्य आहे. सारनाथ येथील प्रवचनात सांगितलेल्या चारआर्यसत्याचा व आर्य अष्टांगमार्गाचा माध्यमातून त्यांनी हा नीतीचा उपदेश लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला.

**ख्रिस्ती धर्म** :— येशू ख्रिस्तांच्या नावाने प्रचलित असलेल्या संप्रदायाला किंवा धर्माला ख्रिस्ती धर्म म्हणतात. येशू ख्रिस्तांनी आपल्या असामान्य दैवी तेजाने, कार्याने, श्रेष्ठ नीतिमूल्यांवर आधारलेल्या धर्माचे प्रवर्तन केले. त्यांच्याच नावाने ओळखला जाणारा हा धर्म म्हणजे 'ख्रिस्ती धर्म' होय.

हा धर्म कोणत्याही शास्त्रावर सिध्दांतावर किंवा सुत्रावर आधारलेला नसून ख्रिस्तांविषयी दृढ श्रध्दा हाच त्याचा पाया होय. आंतरिक नैतिक प्रगती हे धर्माचे खरे लक्षण होय असे ख्रिस्ती धर्म मानतो. त्यांनी सामान्य माणसाला अनुलक्षून उच्चतम नैतिक आदेषांची षिकवण दिलेली आहे. प्रार्थना, परोपकार, बंधूभाव ही मूल्ये आचरणात आणण्यावर ख्रिस्ती धर्माचा भर आहे. अहंकार शून्य व अनन्यशरण ईश्वरी भक्ती हे ख्रिस्ती धर्माचे प्रमुख अंग होय. जीवनात भक्तीभाव विकसित करण्यासाठी वैयक्तिक व सामुदायिक प्रार्थनेला ख्रिस्ती धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. त्याच बरोबर दानधर्म, उपवास, व्रतोत्सव, सण, समारंभ या गोष्टी आचरणात आणण्यावर व तसेच 'पश्चात्तापाला' म्हणजे आपण केलेल्या पापाबद्दल ईश्वराजवळ कबुली देउन त्याची क्षमा मागणे, या पष्चात्तापाला ख्रिस्ती धर्मात मन पालटणे असे म्हणतात. हा पश्चात्ताप मनुश्याचे अहंकेंद्रित्व नष्ट करून त्याला ईश्वर केंद्रित करतो.

जगातील सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करावे. शेजाऱ्यावरच नाही तर वैऱ्यावर देखील प्रेम करा, असा संदेश देणारा ख्रिस्ती धर्म हा करूणा, प्रेम, सेवा या श्रेष्ठ मूल्यांवर आधारलेला असून, विष्वकल्याण ही त्यांची ध्येय दृष्टी आहे. या धर्माने ऐहिक, पारलैकिक, व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाला नीतिमूल्यांचे अधिष्ठान दिलेले आहे. अशाप्रकारे 'धर्म' हाविशय जीवनस्पर्षी आहे. हा मानवी जीवनातील ऐतिहासिक घटक आहे. विविध धर्म संस्थापक, महापुरुश, प्रज्ञावंत, संत यांना जीवनाचा जो अन्वयार्थ समजला तो त्यांच्या त्यांच्या धर्मातून प्रकट झाला आहे व त्यानुसार त्या त्या धर्माच्या लोकसमूहात निर्माण झालेल्या धार्मिक प्रथा, दृष्टिकोण, मूल्यप्रणाली यामधून लोक समुहाचे धर्मशास्त्र निर्माण झाले असून, प्रत्येक धर्माचे धर्मशास्त्र हे स्वतंत्र आहे. प्रत्येकच धर्माने 'सत्य', 'अहिंसा', 'ब्रम्हचर्य', 'अपरिग्रह', 'अस्तेय' इ. जीवनमूल्यांना प्रतिष्ठा दिलेली आढळते. मानवाचा नैतिक विकास व्हावा व अज्ञान दूर व्हावे यासाठीच धर्माचे प्रवर्तन झालेले दिसून येते. त्याप्रमाणे प्रत्येकाने स्वहिता बरोबरच इतरांच्या हितासाठी देखील प्रयत्नशील रहावे, समाजाची सेवा करावी यावर सर्व धर्मांनी भर दिलेले आढळून येतो.

**निष्कर्ष** — सर्व धर्माचा इतिहास पाहता असे लक्षात येते की, प्रत्येकच धर्माच्या प्रवर्तनास व विकासास अनेक चिंतनशील निःस्वार्थी, लोक कल्याणाची इच्छा असणारे संत, महात्म प्रेशित, मुनी अशा महापुरूशांची प्रज्ञा व प्रयत्न यांची मदत झालेली आढळते. अतःप्रज्ञेचा साहाय्याने जाणलेले जीवनरहस्य या महापुरूशांनी आपल्या धर्मप्रणालीतून प्रकट केलेले आढळते. प्रत्येक धर्म संस्थापकाने मानवी जीवनात समाधान, षांती लाभावी व अंतिम सत्याकडे वाटचाल करता यावी म्हणून त्यांच्या धर्मग्रंथात आचारसंहीता घालून दिलेल्या आहेत. प्रत्येक धर्माची स्थापना करणारा धर्मसंस्थापक, त्याने घालून दिलेले आचार, विचार विषयक धर्मग्रंथ हा त्या त्या धर्मांच्या लोकांसाठी श्रेष्ठ ठरतो. म्हणूनच जीवन जगत असताना आपापला धर्मग्रंथ प्रमाण मानूनच सर्व धर्मातील माणसे आयुश्यातील सारे व्यवहार करीत असतात. 'गीता', 'कुराण', 'बायबल', 'त्रिपिटक' यासारखे धर्मग्रंथ क्रमशः हिंदू मुसलमान, ख्रिष्चन, बौध्द इ. समाजाचा व्यवहाराला दिशा देताना दिसतात.

या प्रत्येक धर्मात प्रत्येक माणसाचा परमोच्य विकास व्हावा, त्याला पूर्णत्व प्राप्त व्हावे, त्याला परमोच्च आनंद मिळावा, कैवल्य, निर्वाण, मोक्ष मिळावा ही निःश्रेयस कल्पना प्रभावी दिसते, त्याच प्रमाणे सामाजिक सदाचरणावरही प्रत्येक धर्माने भर दिलेला आढळून येतो. याचाच अर्थ असा की, अभुदय (प्रपंच) आणि निःश्रेयस (परमार्थ) या दोन्हींची सांगड कशी घालावी याचे उत्तम मार्गदर्शन प्रत्येक धर्मात केलेले दिसून येते.

### *संदर्भ ग्रंथ*

1. *दिक्षित श्रीनिवास — भारतीय तत्वज्ञान.*
2. *जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री — लेखनसंग्रह खंड पहिला*
3. *जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री — वैदिक संस्कृतीचा वकास.*
4. *जोशी ज. वा. — धर्माचे तत्त्वज्ञान*